प्रति,

जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी,
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, नंदुरबार

**विषय** :- जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, नंदुरबार येथील सन १ जुलै २०१९ ते ३० जुन २०२० वर्षा करिता जिल्हयातील पशुवैद्यकिय दवाखान्यांना द्रवनत्र पुरवठा करण्यासाठी जिल्ह्याच्या https://nandurbar.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्दीस देणेबाबत...

**जावक क्रमांक :- जिपऊआ/८०३/२०१९, नंदुरबार दिनांक :- १९/८/२०१९**

उपरोक्त विषयान्वये विनंतीपुर्वक सादर करण्यात येते की, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, नंदुरबार येथील सन १ जुलै २०१९ ते ३० जुन २०२० वर्षाकरिता जिल्हयातील पशुवैद्यकिय दवाखान्यांना द्रवनत्र पुरवठा करण्यासाठी जिल्ह्याच्या https://nandurbar.nic.in या संकेतस्थळावर दि. १९/८/२०१९ ते २६/८/२०१९ पर्यंत प्रसिध्दी करण्यात यावी.

**सोबत :-** प्रसिध्दी करावयाच्या द्रवनत्र व रेतमात्रा वाहतूकीसाठी निविदेच्या नियम व अटी जोडला आहे.

(स्वाक्षरी)

**जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त**
**नंदुरबार**

**प्रत** :- माहितीस्तव सादर

१. मा. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य , पुणे-६७

२/ आपणास विनंती करण्यात येते की, वाहतुकिची निविदा सुचना पशुसंवर्धन खात्याच्या https:ah.adfmaharastra.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

२. मा प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, नाशिक विभाग, नाशिक -२

# जिल्हा पशुसंवर्धन उपआसुक्त,जिल्हा नंदुरबार यांचे कार्यालय
# कोटेशन प्रपत्र

जावक क्रमांक :- /जिपऊआ/जिकृरेके/ ८९५-९००/२०१९, नंदुरबार दि. १६/०८/२०१९

नंदुरबार जिल्हयांत द्रवनत्र व रेतमात्रा वाहतुक करुन पुरवठा करणेसाठी निविदा सन २०१९-२०

द्रवनत्र व रेतमात्रांच्या वाहतुकीसाठी निविदेच्या नियम व अटी

द्रवनत्र व रेतमात्रांच्या वाहतुक निविदेच्या शर्ती व अटी खालीलप्रमाणे आहेत.

निविदा दरपत्रके दोन लिफाफा पध्दतीत सादर करणे बंधनकारक आहे.

(अ)पहिला लिफाफा-

१. बयाणा रक्कम ड्राफ्ट (रुपये ५०००/-)
२. पुर्वानुभव तपशील
३. या प्रकारच्या निविदेत भाग घेतला असल्यांस तपशील
४. आयकर भरल्याचे प्रमाणपत्र , भरला असल्यास अंतिम तारखेपर्यंत ग्राहय
५. वाहनाची कागदपत्रे , आर सी बुक , विमा , फिटनेस प्रमाणपत्र व वाहतुक परवाना
६. शर्ती व अटी मान्य असल्याचे सहीसह पत्र

(ब) दुसरा लिफाफा-

१) निविदा पत्रक (दरपत्रक)

### वाहतुकीसाठी लागणारे वाहन व वाहतुकीचा तपशील

अ) निविदा उघडण्यांचे वेळी वाहल कागदपत्रांसह दाखविण्यांत यावे सर्वसाधारणपणे ५०-६० लि. द्रवनत्र क्षमता असलेली ४० द्रवनत्रपात्रे (अंदाजे ४० द्रवनत्रासाठी व १० रेतमात्रांसाठी) वाहुन नेण्यांसाठी लागणारे ६ चाकी वाहन अंदाजित वजन ४ टन किंवा त्यापेक्षा अधिक क्षमता असावी.

खालील नियम व अटींची ठेकेदारांनी नोंद घ्यावी

१. ठेकेदाराने प्रत्येक उपकेंद्रावर द्रवनत्र पात्र देणे व घेणेसाठी सर्वसाधारण अर्धा तास अवधी लागणर असे गृहित धरुन प्रत्येक फेरीच्या वेळी कृत्रिम रेतन केंद्र नंदुरबार येथुन भरलेली द्रवनत्र पात्र घेणे व तेथील रिकामी पात्रे सुस्थितीत परत मुळ ठिकाणी आणावयाची असुन ही सर्व कामे ठेकेदाराने बिनचुक करावयाची आहेत. तसेच द्रवनत्रपात्रे चढ उतार करणेसाठी मदत करावी त्यासाठी प्रती किलोमीटरचा दर द्यावा. फेरीसाठी लागणाऱ्या

मुक्कामाला जादा आकार दिला जाणार नाही. भावबंद करार झालेले वाहन कार्यालयाच्या वळ व इतर कामांसाठी उपलब्ध करुन देण्यांची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

२. जिल्हा कृत्रिम रेतन केंद्राचा प्रतिनिधी वाहनासोबत वाहतुकीचे वेळी राहील व कामकाजाबाबत त्याच्या सुचना ठेकेदारांच्या वाहन चालकांस पाळाव्या लागतील.

३. बिलाची रक्कम अथवा इंधनासाठी आगाऊ धनराशी दिली जाणार नाही.

४. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त नंदुरबार यांनी ठरऊन दिलेल्या दिवशी व वेळेत ठरलेल्या मार्गावर पुरवठयाच्या कार्यक्रमानुसार भावबंद कराराचे वाहन उपलब्ध करुन त्याप्रमाणे वाहतुक करण्यांची जबाबदारी ठेकेदाराची राहील. तसेच अतिरीक्त वाहन लागल्यास ज्यादा वाहन पुरवठयासाठी द्यावे लागेल. दरकराराचे वाहन उपलब्ध नसल्यास पर्यायी व्यवस्था ठेकेदाराला करावी लागेल. तसे न केल्यांस या कार्यालयाकडुन पर्यायी व्यवस्था केली जाईल व त्यासाठी झालेला ज्यादा खर्च ठेकेदाराकडुन वसुल केला जाईल. तसेच रुपये ५००/- त्या दिवशीच्या फेरीसाठी दंड म्हणुन वसुल केले जातील. सदर वसुली त्यांचे बिलातुन किंवा सुरक्षा रकमेतुल वसुल केली जाईल.

५. जर काही कारणाने ठरलेल्या दिवशी व वेळेला द्रवनत्रपात्र पाठविणे शक्य झाले नाही, तर ठेकेदारास त्यासाठी कोणताही मोबदला दिला जाणार नाही . त्यामुळे सदर दिवशीचे वाहतुकीचे काम जेंव्हा करावयाचे त्याचे लेखी/तोंडी माहिती घेऊन त्याप्रमाणे वाहतुक करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

६. वाहतुक केल्यानंतर त्याबाबतचे देयक देण्यांची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

७. वाहनाच्या तळावर जाड काथ्याचे मॅटींग टाकणे व ऊन , वारा, पाऊस यापासुन द्रवनत्रपात्रांचे संरखण यासाठी वाहनावर ताडपत्री/पत्र्यांचे छत असणे आवश्यक आहे.

८. प्रवासादरम्यान द्रवनत्रपात्रांच्या झालेलया नुकसानीस व बरोबर असलेलया कार्यालयाचे प्रतिनीधींना काही इजा झाल्यास त्याची सर्व जबाबदारी ठेकेदारावर राहील.

९. जेंव्हा वाहन या केंद्राच्या कामासाठी वापरात असेल , तेंव्हा इतर कोणतेही प्रवासी व सामानाची त्या वाहनांतुन वाहतुक करता येणार नाही या अटीचे उल्लंघन झाल्यास त्या दिवशीच्या वाहतुकीचे बिल अदा केले जाणार नाही.

१०. जेंव्हा वाहन या केंद्राच्या कामासाठी वापरात असेल तेंव्हा वाहनचालक हा वाहन चालविण्यांस अनुभवी किंवा किमान ३ वर्षे संबधीत प्रकारचे वाहन चालविण्यांचा परवानाधारक , निर्व्यसनी असला पाहिजे. वाहनचालवतांना परवाना व इतर संबधीत कागदपत्रे वाहनधारकाकडे मागणी केल्यांस केंव्हाही पाहण्यांस उपलब्ध असली पाहिजेत.

११. ज्या मार्गावर वाहतुक ठरविली आहे त्या मार्गावरील सर्व उपकेंद्राचा द्रवनत्र पुरवठा न झाल्यास, अर्धवट काम केल्यास त्यासाठीचे बिल अदा केले जाणार नाही. त्यासाठी पुन्हा ठेकेदारास त्याच मार्गावरील काम पुर्ण झाल्यानंतर सर्वसाधारण त्या मार्गावरील सर्व केंद्राच्या पुरवठयासाठीचे जे अंतर होते, तेवढयांच अंतराचे बील ठेकेदारास अदा केले जाईल.

१२. ठेकेदाराने वाहतुकीचया वेळी त्याचे वाहनास काही नुकसान झाल्यास स्वतः सोसावयाचे आहे. तसेच त्यांच्या कर्मचाऱ्यांकडुन शासनाचे काही नुकसान झाल्यास त्याची पुर्ण भरपाई करुन देण्यांची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

१३. वाहतुकीचया वेळी लागणारे पुरेसे इंधन व खर्चासाठी संपुर्ण व्यवस्था करण्यांची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

१४. वाहतुकीच्या वेळी काही कायदेशीर बाबी न पाळलयाने ठेकेदाराचे काही नुकसान झाल्यांस त्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

१५. वाहतुकीचा परवाना व इतर बाबी योग्य असण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

१६. वाहतुकीचे काम समाधानकारक करण्यांत येत नसल्याचे अढळल्यास मा. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त नंदुरबार यांना सदरचा करार केंव्हाही कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार राहील व त्यांस अशा वेळी भरलेली सुरक्षा रक्कम शासनाला कायमची जमा करण्यांचा अधिकारी त्यांना राहील.

१७. कराराबाबतचे कोणत्याही मतभेदासाठी मा. प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन नाशिक विभाग नाशिक-२ हे अपिलीय अधिकारी राहतील व त्यांचा निर्णय ठेकेदारास बंधनगारम राहील व तो अंतिम निर्णय राहील.

१८. वाहतुकीचे वेळी शासनाचे मालमत्तेचे नुकसान झाल्यास ठेकेदारास त्याची संपुर्ण भरपाई करुन द्यावी लागेल.

१९. शासनाचे/मंडळाचे वाहन उपलब्ध झालयास त्याने वाहतुक करणेचा अधिकार केंद्र प्रमुखास राहील व त्यास ठेकेदाराकडुन कोणत्याही प्रकारचा प्रत्यवाय राहणार नाही व ठेकेदारास अशा वाहतुकीस आडकाठी करता येणार नाही.

२०. वाहतुकीच्या कराराचा कालावधी दिनांक ०१/७/२०१७ ते ३०/०६/२०१८ असा राहील परंतु नवा करार दिनांक ३०/०६/२०१८ पुर्वी न झाल्यास , पुन्हा करार होईपर्यंत त्याच दराने वाहतुक करणेची जबाबदारी राहील.

२१. निविदा सादर करावयाच्या असतील त्यांना या कार्यालयातुनच कोरी निविदापत्रे दिनांक २४/०८/२०१७ रोजी पासुन ते दिनांक ०७/०९/२०१७ पर्यत कार्यालयीन वेळेत रुपये ७५०/- (रुपये सातशे पन्नास मात्र) रोख अथवा राष्ट्रीयकृत बॅकेचा डिमांड ड्राफट, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त नंदुरबार यांचे नांवे पुर्ण देय , भरुन (ना-परतावा) अटीवर उपलब्ध होऊ शकतील.

२२. निविदा व प्रपत्र अनुषंगिक कार्यक्रमाचा तपशील नियम व अटी सहित या कार्यालयातुन सुटटीचे दिवस सोडुन कार्यालयीन वेळेत खरेदी करुन ठरलेल्या तारखेस व वेळेपुर्वी भरुन त्यावर स्वाक्षरी करुन सादर कराव्यांत. अन्यथा त्या विचारांत घेतल्या जाणार नाहीत.

२३. ज्या निविदा अपुर्ण व नियम अटी मान्य असलयाबद्दल स्वाक्षरी नसलेलया तसेच योग्य त्या रकमेचे बयाण रक्कम न जोडलेल्या प्राप्त होतील , त्यांचा विचार केला जाणार नाही. नियोजित तारीख व वेळेनंतर प्राप्त झालेलया निविदांचा विचार केला जाणार नाही.

२४. निविदासोबत रुपये ५०००/- (रुपये पाच हजार मात्र) इतकी बयाणा रक्कम म्हणुन स्टेट बॅक ऑफ इंडिया किंवा राष्ट्रीकृत बॅकेचा डी.डी. स्वरुपात भरावी.

२५. ज्या ठेकेदाराची निविदा मंजुर होईल त्याला रुपये १००/- च्या स्टॅपपेपरवर करारनामा करुन तो स्वखर्चाने रजिसटर्ड करुन द्यावा लागेल वार्षिक भाडयाच्या रकमेच्या ३ टक्के रक्कम टिडीआर स्वरुपात मा जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त जि. पुणे नंदुरबार यांच्या नांवे सुरक्षा रक्कम म्हणुन भरावी लागेल. भावबंद करार संपुष्टात आल्यानंतर ३ महिन्यांनी कोणतीही तक्रार नसल्यास किंवा कार्यालयाचे देणे नसल्यास बिनव्याजी परत करण्यांत येईल निविदा मंजुर झाल्याचे या कार्यालयाचे पत्र पोहोचताच आठ दिवसांचे आंत अशी कार्यवाही न झाल्यांस त्या ठेकेदाराची निविदासोबत भरलेली बयाणा रक्कम शासनांस जमा होऊन कोणतीही सुचना न देता पुढील निर्णय घेण्यांचे सर्व हक्क मा जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त जिल्हा नंदुरबार यांना राहतील व त्यांचा निर्णय हा अंतिम व बंधनकारक राहील.

२६. वाहनाचा दर हा रुपये प्रति किलोमीटर प्रमाणे देण्यांत यावा.

२७. वाहनांत वाहनचालक, या कर्यालयाचा एक प्रतिनिधी व त्यांचे सहाय्यक व्यवस्थित पुढे बसु शकतील अशी सोय असावी.

२८. निविदामध्ये नमुद केलेले वाहन हे निविदा उघडताना समितीपुढे दाखविण्यांस आणावे लागेल. व त्याच वाहनाने द्रवनत्र पात्रांची वाहतुक करावी लागेल. या कार्यालयाने अतिरीक्त वाहनाची मागणी केल्यास ते वाहन द्रवनत्र पात्रांच्या वाहतुकीसाठी चालेल.

२९. निविदेमध्ये वाहनाचा प्रकार निदेशित केला पाहिजे.

३०. डिझेल , पेट्रोल, व इंधन दरात दरवाढ झाल्यांस, अथवा इतर कोणत्याही कारणांस्तव कराराच्या कालावधीमध्ये दर वाढवुन दिले जाणार नाही, तसेच टोल नाका शुलक / इतर कोणतेही वाहतुक शुल्क हे ठेकेदाराने भरावयाचे आहे.

३१. निविदा उघडतेवेळी संबधित ठेकेदाराने शिधापत्रिकेची मुळ प्रत समितीस सादर करणे अनिवार्य असुन त्याची छायांकित प्रत निविदा प्रपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे.

३२. सदरची निविदा प्रपत्रे दिनांक २४/०८/२०१७ रोजी पासुन ते दि ०७/०९/२०१७ रोजी पर्यत कार्यालयीन वेळमध्ये उपलब्ध होतील.

३३. पहिला लिफाफा व दुसरा लिफाफा वेग-वेगळा सिलबंद करुन, तिसऱ्या मोठया लिफाफयामध्ये घालुन , त्या निविदा पाकिटावर " जिल्हयांत द्रवनत्र व रेतमात्रा वाहतुक करुन पुरवठा करणेसाठी निविदा सन २०१७-१८" असे लिहावे पाकीट मोहोरबंद करुन ते मा जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त जि नंदुरबार यांच्या कार्यालयात दिनांक ०८/०९/२०१७ सकाळी १३.३० वाजेपर्यंत पोहोचतील असे समक्ष कार्यालयात आणुन द्यावीत. सदरहु निविदा दिनांक ०८/०९/२०१७ रोजी दुपारी १५.०० वाजता मा जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त जि. नंदुरबार या कार्यालयात उघडल्या जातील.

३४. निविदा प्रक्रियेत अकारण बाधा आणने , तांत्रिक लिफाफ्यांत सादर केलेली कागदपत्रे व वाहन या मध्ये तफावत आढळणे ई. आढल्यास सदर निविदाधारकाला प्रक्रियेतुन अप्राप्त ठरिविले जाईल व त्यांचे नांव प्रतिबंधित (काळया) यादीत समाविष्ठ करण्यांत येईल.

३५. कोणतेही कारण न दर्शविता कोणतीही किंवा सत्र निविदा नाकारण्यांचा अधिकार हा मा.जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त जि नंदरबार यांना राखुन ठेवला आहे.

द्रवनत्र व रेतमांत्रांच्या वाहतुकीचे नियम व अटी तसेच वाहतुकीच्या मार्गाचा तपशील आणि प्रत्येक उपकेंद्रावर थांबावा लागणारा कालावधी याची माहिती मी पुर्ण घेत आहे तसेच नियम व अटी मला सर्व मान्य आहेत.

ठिकाण- नंदुरबार

दिनांक-१६/०८/२०१९

निविदा धारकाची स्वाक्षरी-स

निविदा धारकाचा पुर्ण पत्ता-

दुरध्वनी क्रमांक-

साक्षीदार- १

२

## वाहतुक दरासंबंधी प्रपत्र

| अ.क्र. | वाहतुक दराचा तपशील | दर र (अंकी व अक्षरी) |
|---|---|---|
| १ | प्रती किलोमीटर | |

निविदा धारकाची स्वाक्षरी-

निविदा धारकाचा पुर्ण पत्ता-

दुरध्वनी क्रमांक-

दिनांक -